या समवेतः- बुधवार दिनांक-१०/०१/२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. प्राप्त झालेल्या अहमदनगर जिल्हा परिषदेच्या,स्थायी समिती सभेचे कामकाज कार्यवृत्त जोडले आहे.

---

अहमदनगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग
क्र.साप्रवि-१/परिषद/स्थायी सभा/५२/२०२४
अहमदनगर, दिनांक १९/०१/२०२४

प्रत माहितीसाठी सादर,

१. मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,अहमदनगर
२. मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,अहमदनगर
३. मा.प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा,अहमदनगर
४. खाते प्रमुख सर्व

२/-आपल्या खात्यासंबंधी विषय व त्याबाबतचे ठरावासंबंधी, तसेच सभेमध्ये झालेल्या चर्चेत उपस्थित केलेल्या प्रत्येक मुददयावर उचित कार्यवाही करुन त्याचा अनुपालनचा लेखी अहवाल सामान्य प्रशासन विभागास त्वरीत पाठवावा,म्हणजे पुढील स्थायी समिती सभेस अनुपालन सादर करता येईल.

(राहुल शेळके)
सचिव,स्थायी समिती सभा तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी,(सा.)
जिल्हा परिषद,अहमदनगर.

स्थायी समिती सभा बुधवार दिनांक १०/०१/२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. सभेचे कार्यवृत्त

## हजर अधिकारी

| अ.क्र. | नाव | अ.क्र | नाव |
|---|---|---|---|
| १ | मा.श्री आशिष येरेकर<br>प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी | २ | मा.श्री.संभाजी लांगोरे<br>अति.मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ३ | श्री.राहुल शेळके सचिव स्थायी समिती<br>तथा,उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) | ४ | श्री.शैलेश मोरे<br>मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| ५ | श्री दादाभाऊ गुंजाळ<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(ग्रा.पं.) | ६ | श्री.समर्थ शेवाळे<br>प्रकल्प संचालक जलजीवन मिशन |
| ७ | श्री मनोज ससे<br>जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबाक) | ८ | श्री.सतिश कानिटकर<br>प्रभारी कार्यकारी अभियंता (सा.बां.दक्षिण) |
| ९ | श्री.संजय शेवाळे<br>कार्यकारी अभियंता (सा.बां.उत्तर) | १० | श्री.दिलीप सोनकुसळे<br>प्र.उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक<br>(मग्रारोहयो) |
| ११ | श्री.पाडुरंग गायसमुद्रे<br>जिल्हा जलसंधारण अधिकारी (ल.पा) | १२ | श्री.श्रीरंग गडदे<br>प्र.कार्यकारी अभियंता,(ग्रा.पा.पु.) |
| १३ | श्री निलेश कानवडे<br>कृषि विकास अधिकारी | १४ | डॉ.श्री दशरथ दिघे<br>जिल्हा पशुसवंर्धन अधिकारी |
| १५ | डॉ.श्री बापूसाहेब नागरगोजे<br>जिल्हा आरोग्य अधिकारी | १६ | श्री.भास्कर पाटील<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक) |
| १७ | श्री.अशोक कडूस<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक) | १८ | श्री राधाकिसन देवढे<br>प्र.जिल्हा समाज कल्याण अधिकारी |
| १९ | श्री राजु लाकुडझोडे<br>उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी | २० | श्री. निखिल पठारे<br>प्र.उप अभियंता (भु.स.वि.यो.) |

<u>विषय क्रमांक १</u>:- दि.११/१२/२०२३ रोजीची स्थायी सभा पुर्ण झालेल्या सभेचे इतिवृत वाचुन कायम करणे .

<u>ठराव क्र.७२:-</u> दि.११/१२/२०२३ रोजी सकाळी ११.०० वा.पुर्ण झालेल्या सभेचे इतिवृत कायम करणे व मंजूर ठरावावर संबंधित खात्याने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणेत येऊन त्यावर महत्वाचे कार्यवाहीच्या मुद्यावर संबंधित विभागाने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेऊन त्यांची नोंद घेणेत आली.संबंधित सर्व खातेप्रमुखांनी सभेतील कामकाजानुसार तातडीने उचित कार्यवाही करुन अनुपालन सादर करावे.

<u>विषय क्रमांक २ :</u>- डॉ.महेश भिमराव भालेराव पशुधन विकास अधिकारी पशुवैदयकीय दवाखाना श्रे१ बाभळेश्वर ता.राहाता याची वैदयकीय कारणास्तव परावर्तीत रजा मंजुर करणेबाबत.

प्रस्तावना- डॉ.महेश भिमराव भालेराव पशुधन विकास अधिकारी पशुवैदयकीय दवाखाना श्रे-१ बाभळेश्वर ता.राहाता यांची दिनांक ०५/११/२०२२ ते ३१/०१/२०२३ अखेर एकुण ८८ दिवसांची वैदयकीय कारणास्तव वैदयकीय रजा खालील प्रमाणे मंजुर करणेबाबत

शिल्लक वैदयकीय रजा- ५१८ खर्ची टाकावयाची रजा- ८८ x २ =१७६

मंजुरीनंतर शिल्लक रजा – ३४२

नियमातील तरतुद-महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ कलम १०९ (३)(ड) नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांची एक महिन्यापर्यंत रजा व गट अ व गट ब च्या जिल्हा परिषद नियंत्रणाखाली असलेल्या अधिका-यांची २ महिन्यापेक्षा जास्त व ४ महिन्यांपेक्षा कमी रजा मंजुर करण्याचे अधिकारी मा.स्थायी समिती जिल्हा परिषद अहमदनगर यांना आहेत.

परंतु महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ कलम ९१ब व ७५ब या कलमान्वये महाराष्ट्र शासनाचे जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जिल्हा परिषदांच्या सर्व अधिकाराचा वापर करण्यासाठी व त्यांची कर्तव्य पार पाडण्यासाठी २१ मार्च २०२२ पासुन जिल्हा परिषदांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, विषय समित्यांचे सभापती यांचे सर्व अधिकारांचा वापर करणेसाठी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर यांना सर्व अधिकारी प्रदान करण्यात आलेले आहेत.

**<u>ठराव क्रंमाक ७३</u>**:-डॉ.महेश भिमराव भालेराव पशुधन विकास अधिकारी पशुवैदयकीय दवाखाना श्रे-१ बाभळेश्वर ता.राहाता यांची दिनांक ०५/११/२०२२ ते ३१/०१/२०२३ अखेर एकुण ८८ दिवसांची वैदयकीय कारणास्तव वैदयकीय रजा मंजूर करावयची आहे. डॉ.महेश भिमराव भालेराव पशुधन विकास अधिकारी पशुवैदयकीय दवाखाना श्रे-१ यांचे मुळ सेवा पुस्तकांत वैदयकीय रजे खाती ५१८ दिवस शिल्लक आहेत. त्यांची मागणी विचारात घेता वैदयकीय रजा ८८ x २ =१७६ दिवस दुप्पट खर्ची घालुन महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ कलम १०९ (३)(ड) अन्वये या व्दारे मान्यता देण्यात येत आहे.

**<u>विषय क्रं-३</u>:-** जिल्हा ग्रामविकास निधीचे कामकाज पाहणेकरीता एक वरीष्ठ सहाय्यक (लेखा) यांच्या नेमणुकीस मुदतवाढ मिळणेबाबत.

प्रस्तावना – जिल्हा ग्राम विकास निधीमधून ग्रामपंचायतींना देण्यात येणा-या कर्जाची वसुली ०.२५ टक्के अंशदान, हिशोब, कर्जवाटप व वसुलीचा हिशोब अद्यावत ठेवण्यासाठी वरीष्ठ सहा.लेखा यांची स्वतंत्ररीत्या आवश्यकता आहे. मा.विभागीय आयुक्त नाशिक यांनी त्यांचेकडील पत्र क्र. विआशा/कार्या-१९/पंरा./१२७८२/६०५१/२०२३ दि. २५/०२/२०२३ ग्रामविकास विभागाचे परिपत्रक दि.३१/०७/७१ व दि.२३/१०/७३ मधील सुचनेच्या अधिन राहुन मा.विभागीय आयुक्त यांना मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १३३ प्राप्त अधिकारानुसार दि. ०१/०३/२०२३ ते दि.२९/०२/२०२४ या एका वर्षाच्या कालावधीकरीता वरीष्ठ सहा.लेखा नेमणुकीस मान्यता दिलेली आहे. तथापि सदर नेमणुकीची मुदत दि.२९/०२/२०२४ रोजी संपूष्टात येत आहे. त्यापुढील कालावधीसाठी म्हणजेचं दि.०१/०३/२०२४ ते दि.२८/०२/२०२५ साठी मा.विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचेकडून मुदतवाढ घेणे आवश्यक आहे. म्हणून स्थायी समितीची शिफारस होणे आवश्यक आहे.

नियमातील तरतुद- ग्राम विकास विभागाचे परिपत्रक क्र.व्हिपीएम/२१७१/५१०८/ई-१ दि.३१/०७/७१ मधील निर्देशानुसार मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ (सुधारीत १९७०) मधील कलम १३३ नुसार मा.विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचे परवानगीने जिल्हा ग्रामविकास निधीमधून स्थायी समिती यांनी निश्चित केलेल्या कर्मचा-यांपैकी वरीष्ठ सहा.लेखा या पदास मा.विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांनी शासन परिपत्रक व्हिपीएफ/१०७३/३१४१७ दि.२३/१०/७३ अन्वये मंजुरी दिनांक २९/०२/२०२४ पर्यंत दिलेली आहे.

विभागाचे अभिप्राय – जिल्हा ग्राम विकास निधीचे कामकाज पहाणेकरीता वरीष्ठ सहा.लेखा या पदास दि.०१/०३/२०२४ ते दि.२८/०२/२०२५ पर्यंत मान्यता मिळावी म्हणून प्रस्ताव मा.विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचेकडे सादर करण्यास शिफारस होण्यास विनंती आहे.

**ठराव क्रं ७४ :–** अहमदनगर जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाने प्रस्तावित केल्यानुसार जिल्हा ग्राम विकास निधीमधून ग्रामपंचायतींना देण्यात येणा-या कर्जाची वसुली ०.२५ टक्के अंशदान, हिशोब, कर्जवाटप व वसुलीचा हिशोब अद्यावत ठेवण्यासाठी वरीष्ठ सहा.लेखा यांची स्वतंत्ररीत्या आवश्यकता आहे.जिल्हा ग्रामविकास निधीचे कामकाज पाहणे करिता एक वरिष्ठ सहाय्यक (लेखा) यांच्या नेमणुकीस मा.विभागीय आयुक्त नाशिक यांना मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १३३ प्राप्त अधिकारानुसार दि. ०१/०३/२०२३ ते दि.२९/०२/२०२४ या एका वर्षाच्या कालावधीकरीता वरीष्ठ सहा.लेखा नेमणुकीस मान्यता दिलेली आहे. तथापि सदर नेमणुकीची मुदत दि.२९/०२/२०२४ रोजी संपूष्टात येत आहे. त्यापुढील कालावधीसाठी म्हणजेचं दि.०१/०३/२०२४ ते दि.२८/०२/२०२५ साठी मा.विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांनी मुदतवाढ द्यावी अशी शिफारस या ठरावाद्वारे करण्यात येत आहे.

**विषय क्रंमाक ४:-** ग्रामपंचायत म्हसणे सुलतानपूर.ता.पारनेर येथे शॉपिंग बांधण्यासाठी जिल्हा ग्राम विकास निधीतून कर्ज मिळणेबाबत.

गट विकास अधिकारी पंचायत समिती पारनेर यांचेकडील पत्र क्र.ग्रापं-२/९६३/२०२३ दिनांक २३/१०/२०२३ अन्वये प्रस्ताव सादर केलेले आहे. सदर प्रस्तावात ग्रामपंचायत म्हसणे सुलतानपूर.ता.पारनेर येथे शॉपिंग सेंटर बांधकाम करण्यासाठी जिल्हा ग्राम विकास निधीतून कर्ज रु. १५,००,०००/- ची मागणी केलेली आहे.

ग्रामपंचायत म्हसणे सुलतानपूर.ता.पारनेर यांची मासिक सभा दिनांक २८/०७/२०२३ ठराव क्र. ९ अन्वये तसेच पंचायत समिती पारनेर सर्वसाधारण सभा दिनांक २०/१०/२०२३ ठराव क्रं. ३ अन्वये तसेच ग्रामसभा ठराव क्र. १४ दि. ०८/०६/२०२३ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु. ६०,००,०००/- इतके आहे.

ग्रामपंचायत म्हसणे सुलतानपूर.ता.पारनेर यांची मागील तीन वर्षाच्या आर्थिक स्थितीची तपासणी केली असता व गट विकास अधिकारी पंचायत समिती पारनेर यांचे शिफारशीची तपासणी केली असता

उत्पन्न व खर्चाचा तपशील अनुसरुन शासन निर्णय व्हीपीए/११५९/पीपीएच/६०दि.२३/०१/१९६० अन्वये अंदाजपत्रकाचे ७५ टक्के रक्कम देता येईल व तसेच शासन निर्णय जिल्हा ग्राम विकास निधी नियम १९६०(१ ली सुधारणा) २००० दिनांक २५/८/२००० नियम ११(३)(ब) अन्वये उत्पन्नाच्या तीन वर्षांच्या सरासरीचे ३० पट (उत्पादक बाबींसाठी) ग्रामपंचायतीचे परत फेडीचे ऐपत लक्षात घेता रक्कम रु. १५,००,०००/- इतके रक्कम कर्ज खालील अटी व शर्तीवर देता येईल.

१. ज्या कामासाठी कर्ज दिलेले आहे त्या कामासाठी वापर करणेत यावे.
२. कर्जाची परत फेड १० वर्षांत परतफेड करण्यात यावे.
३. सदर कर्जावर व्याज प्रति वर्ष ५ टक्के व दिलेल्या मुदतीत न भरल्यास दंडात्मक व्याज २.५ टक्के अकारण्यात येईल.
४. बांधकाम स्वतःच्या मालकी हक्काचे जागेवरचं करण्यात यावे.
ग्रामपंचायतीकडील विहीत जागेवर बांधकाम करावयाचे असल्यास सक्षम प्राधिकारी / प्राधिकरण यांचे मान्यता घेवून बांधकाम सुरु करावे.

५. बांधकाम सुरु करण्यापुर्वी सक्षम प्राधिकारी / प्राधिकरण (उदा.रस्ते, वीज) यांचा नाहरकत दाखला घ्यावा.

नियमातील तरतुदी –

१. मुंबई जिल्हा ग्रामविकास निधी नियम विपीए/११५९/पीपीएच/६० दिनांक २३/१/१९६० अनुसार ७५ टक्के रक्कम देता येईल.

२. मुंबई जिल्हा ग्रामविकास निधी (१ली सुधारणा) २००० दि.२५/८/२००० नियम ११(३)(ब) अन्वये.
३. मुंबई जिल्हा ग्रामविकास निधी (१ली सुधारणा) २००० दि.२५/८/२००० नियम ११(२) (क) व (ड)

<u>ठराव क्र.७५ :-</u> ग्रामपंचायत म्हसणे सुलतानपूर. ता.पारनेर येथे शॉपिंग सेंटर बांधण्यासाठी जिल्हा ग्रामविकास निधीतून कर्ज रु. १५,००,०००/- ची मागणी केलेली आहे. शासन निर्णय व्हीपीए/११५९/पीपीएच/६०दि. २३/०१/१९६० अन्वये अंदाजपत्रकाचे ७५ टक्के रक्कम देता येईल व तसेच शासन निर्णय जिल्हा ग्राम विकास निधी नियम १९६०(१ ली सुधारणा) २००० दिनांक २५/८/२००० नियम ११(३)(ब) अन्वये उत्पन्नाच्या तीन वर्षांच्या सरासरीचे ३० पट (उत्पादक बाबींसाठी) ग्रामपंचायतीचे परत फेडीचे ऐपत लक्षात घेता रक्कम रु. १५,००,०००/- इतके रक्कम कर्ज खालील अटी व शर्तीवर देता येईल.
१. ज्या कामासाठी कर्ज दिलेले आहे त्या कामासाठी वापर करणेत यावे.
२. कर्जाची परत फेड १० वर्षांत परतफेड करण्यात यावे.
३. सदर कर्जावर व्याज प्रति वर्ष ५ टक्के व दिलेल्या मुदतीत न भरल्यास दंडात्मक व्याज २.५ टक्के आकारण्यात येईल.
४. बांधकाम स्वतःच्या मालकी हक्काचे जागेवरचं करण्यात यावे.

ग्रामपंचायतीकडील विहीत जागेवर बांधकाम करावयाचे असल्यास सक्षम प्राधिकारी / प्राधिकरण यांचे मान्यता घेवून बांधकाम सुरु करावे.

५. बांधकाम सुरु करण्यापुर्वी सक्षम प्राधिकारी / प्राधिकरण (उदा.रस्ते, वीज) यांचा नाहरकत दाखला घ्यावा.

सचिव तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(सा.)
जिल्हा परिषद, अहमदनगर

प्रशासक तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर